Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# केंद्रीय अर्थसंकल्प एक आढावा
## (विशेष संदर्भ-२०१७-१८)

**प्रा.डॉ.भगवान सांगळे**
वाणिज्य विभाग,
बाबुजी आव्हाड महाविद्यालय,पाथर्डी
जि.अहमदनगर

**प्रस्तावना:**

अंदाजपत्रकाला इंग्रजीत बजेट (Budget) असे म्हणतात. बजेट हा इंग्रजी शब्द फ्रेंच भाषेतील बुजेट (Bougette) या शब्दावरुन निर्माण झाला आहे.फ्रेंच भाषेतील या शब्दाचा अर्थ होतो,कागदपत्रे, नोटा इत्यादी ठेवण्याची छोटी कातडी पिशवी (Bag or Wallet) अर्थविषयक महत्वाची कागदपत्रे ठेवण्यासाठी वापरण्यात येणा-या या पिशवीवरुन त्या कागदपत्रांना बजेट म्हणण्याचा प्रघात पडला. आधुनिक अर्थाने हा शब्द पहिल्यांदा इंगलंडमध्ये १७३३ मध्ये सर रॉबर्ट वालपोल याने तेथील पार्लमेंटमध्ये अंदाजपत्रकासंबंधीचे कागदपत्र आपल्या चामडयांच्या पिशवीतून बाहेर काढून चर्चेसाठी ठेवले,त्यावेळी बजेट ओपन केले असे म्हटले गेले.तेव्हापासून बजेट हा शब्द प्रशासनात कायमचा रुढ झाला आहे.तेव्हापासून इंग्लंडमध्ये वित्तमंत्री ज्या दिवशी हाउस ऑफ कॉमन्समध्ये आपले अंदाजपत्रकीय भाषण देण्यास जात असत त्या दिवशी इंग्लंडमधील वृत्तपत्रे त्या वित्तमंत्र्याच्या हातात पिशवी घेतलेला फोटो छापतात. अशीच प्रथा आपल्याकडे पडलेली दिसते.

दर वर्षी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जातो. भारत पारतंत्र्यात असताना ईस्ट इंडिया कंपनीतर्फे १८ फेब्रुवारी १८६९ रोजी पहिला अर्थसंकल्प सादर केला गेला. हा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान तत्कालीन अर्थमंत्री जेम्स विल्यम्सन यांना जातो. जेम्स विल्सन इंडियन कौन्सिलचे अर्थविषयक सदस्य होते.याच विल्सन यांनी पुढे जावून स्टॅंडर्ड चार्टड बॅंक आणि द इकॉनॉमिस्टचा पाया रचला.

अर्थसंकल्प म्हणजे काय.

अर्थसंकल्प म्हणजे सरकारने आपल्या उत्पन्नाची आणि खर्चाची तयार केलेली एक योजना होय.

अर्थसंकल्पाच्या व्याख्या.

- फ्रेडरिक टेलर यांच्या शब्दात एका निश्चित काळासाठी शासनाने केलेली आर्थिक योजना म्हणजे अंदाजपत्रक होय.
- भारतीय राज्यघटनेच्या कलम ११२ प्रमाणे अंदाजपत्रक म्हणजे आगामी वित्तीय वर्षासाठी तयार केलेले वार्षिक विवरणपत्र होय.ज्यामध्ये शासनाचा पूर्वअनुमानित महसूल आणि खर्च यांचा समावेश केलेला असतो.

**अंदाजपत्रकाचे प्रकार.**

अंदाजपत्रकाचे तीन प्रकार आहेत.

**१.समतोल अंदाजपत्रक:**

अंदाजपत्रक संतूलित असावे यांचा अर्थ असा की अनुमानित खर्च अनुमानित उत्पन्नापेक्षा जास्त असू नये.या अंदाजपत्रकात खर्च आणि उत्पन्न समान असेल तर त्यास समतोल अंदाजपत्रक म्हणतात.

**२.शिल्लकीचे अंदालपत्रक:**

ज्या अंदाजपत्रकातील खर्च हे उत्पन्नापेक्षा कमी असतो किंवा ज्या अंदाजपत्रकातील उत्पन्न हे खर्च करुन शिल्लक राहते त्याला शिल्लकीचे अंदाजपत्रक म्हणतात.

**३.तुटीचे अंदाजपत्रक:**

ज्या अंदाजपत्रकात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असतो, त्याला तुटीचे अंदाजपत्रक म्हणतात.

**संशोधनाची उदिष्टये:**

- अर्थसंकल्पाची संकल्पना समजून घेणे.
- अर्थसंकल्पाचे सादरीकरण कोणी केले ते समजून घेणे.
- अर्थसंकल्पाची वैशिष्टये समजून घेणे.
- आयकर स्लॅबचे दर समजून घेणे.

**संशोधन पध्दती:**

हा संशोधन लेख पुर्ण करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे.ज्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रातील लेख तसेच इंटरनेटवरील माहितीचा आधार घेतला आहे. तसेच प्रस्तृत संशोधन लेख पुर्ण करण्यासाठी विश्लेषणात्मक व अनुभवावर आधारीत पध्दतीचा वापर केला आहे.

अर्थसंकल्पाचे सादरीकरण

देश स्वतंत्र झाल्यानंतर पहिला अर्थसंकल्प मांडण्याचा मान मिळाला तो तत्कालीन अर्थमंत्री आर.के.षणमुगम चेटटी यांना २६ नोव्हेबर १९४७ रोजी त्यांनी अर्थसंकल्प सादर केला.या

अर्थसंकल्पात देशाच्या अर्थव्यवस्थेची समीक्षा करण्यात आली तसेच कोणत्याही कर सुचविण्यात आला नव्हता.चेटटी यांच्यानतर के.सी.नियोगी अर्थमंत्री बनले मात्र केवळ ३५ दिवसच ते या पदावर होते. देशाच्या इतिहासात अर्थसंकल्प सादर न करणारे नियोगी हे एकमेव अर्थमंत्री आहेत.

आजपावतो सर्वाधिक अर्थसंकल्प सादरीकरणाचा विक्रम मोरारजी देसाई यांच्या नावावर आहे. त्यांनी दहा वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे.त्याखालोखाल सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प मांडणा-यामध्ये प्रणव मुखर्जी, पी. चिदंबरम, यशवंत सिन्हा, यशवंतराव चव्हाण आणि सी.डी. देशमुख इत्यादीनी प्रत्येकी सात वेळा अर्थसंकल्प सादर केला. डॉ.मनमोहन सिंग आणि टी.टी. कृष्णम्माचारी यांनी प्रत्येकी सहावेळा अर्थसंकल्प सादर केला.

केंद्रीय अर्थसंकल्प अर्थमंत्र्याकडूनच सादर केला जातो.मात्र आजपर्यतच्या इतिहासात जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांनी पंतप्रधानपद भूषवतानाच अर्थसंकल्प सादर केला होता.त्यांच्या मंत्रिमंडळातील अर्थमंत्र्यांनी राजीनामा दिल्याने ही परिस्थिती निर्माण झाली होती.

अर्थसंकल्प हा कोणत्याही केंद्र सरकारचा गोपणीय दस्तऐवज आहे. अर्थसंकल्प तयार करण्यासाठी अर्थमंत्रालयातील शंभराहून अधिक कर्मचारी दोन ते तीन आठवडे संसदेच्या नॉर्थ ब्लॉक या इमारतीतच वास्तव्यासाठी असतात.

या दरम्यान त्यांचा बाहेरील जगाशी संपर्क तोडण्यात येतो.इतकेच काय त्यांना आपल्या कुटूंबीयाशी बोलण्याची अनुमती नसते. त्यांच्याकडे असणा-या फोनवर केवळ तो रिसीव्ह करण्याचीच व्यवस्था असते. अर्थसंकल्पाची कागदपत्रे अर्थमंत्रालयाच्या छापखाण्यातच प्रसिध्द होतात.

अर्थमंत्रालयाच्या कर्मचा-यांनी तयार केलेला दस्तावेज अंतिम छपाईला जाण्यापुर्वी नॉर्थ ब्लॉक इमारतीमध्ये हलवा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते.या कार्यक्रमात केंद्रीय अर्थमंत्री हलवा अर्थात शिरा तयार करतात आणि उपस्थित सर्व कर्मचा-यांना त्याचे वाटप करण्यात येते.एक मोठया कढईत शिरा तयार केला जातो.

**अर्थसंकल्पाची वैशिष्टये (२०१७-१८):**

- ➢ युनियन बजेट इन्फर्मेशन सिस्टिमवरच सर्व तपशिल अपलोड करण्यात आला,पेन ड्राइव्ह किंवा कागदपत्राचा वापर नाही.
- ➢ नियोजित व नियोजनबाहय खर्च असा फरक केला नाही.
- ➢ आर्थिक पाहणी अहवाल ३१ जानेवारी २०१७ रोजी सादर केला.
- ➢ रेल्वे अर्थसंकल्प नाही.
- ➢ विविध योजना मांडताना त्यात केंद्र व राज्य अशा वेगवेगळया तरतुदी केल्या नाहीत.

**आयकर स्लॅबचे दर:**

आयकर स्लॅब (सन २०१४-१५ ते २०१७-१८)

| वर्ष | सर्व सामान्य लोक | | जेष्ठ नागरिक | | अति जेष्ठ नागरिक | |
|---|---|---|---|---|---|---|
| | वार्षिक उत्पन्न (६० वर्षापर्यत) | दर (टक्के) | वार्षिक उत्पन्न (६० ते ८० वर्षापर्यत) | दर (टक्के) | वार्षिक उत्पन्न (६० ते ८० वर्षापर्यत) | दर (टक्के) |
| २०१४-२०१५ | ० ते २,५०,०००<br>२,५०,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ३,००,०००<br>३,००,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>२०<br>३० |
| २०१५-२०१६ | ० ते २,५०,०००<br>२,५०,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ३,००,०००<br>३,००,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>२०<br>३० |
| २०१६-२०१७ | ० ते २,५०,०००<br>२,५०,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ३,००,०००<br>३,००,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>२०<br>३० |
| २०१७-२०१८ | ० ते २,५०,०००<br>२,५०,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ३,००,०००<br>३,००,००१ ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>१०<br>२०<br>३० | ० ते ५,००,०००<br>५,००,००१ ते १०,००,०००<br>१०,००,००० पेक्षा जास्त | -<br>२०<br>३० |

वरील तक्ता वरुन असे लक्षात येते की सन २०१४-१५ मध्ये सर्व सामान्य लोकांसाठी प्रत्यक्ष कराची प्रमाणित कपात २.५ लाख पर्यत होती, जेष्ठ नागरिकांसाठी ३ लाख रुपये प्र्यंत होती.तर अति जेष्ठ नागरिकांसाठी ५ लाख पर्यंत सुट होती. तसेच २.५ लाखाच्या पुढे आणि ५ लाखापर्यत १० टक्के प्रत्यक्ष कराचा दर होता. तर ५ लाखाच्या पुढे आणि १० लाखापर्यत २० टक्के प्रत्यक्ष कराचा दर होता. तर १० लाखाच्या पुढे ३० टक्के प्रत्यक्ष कराचा दर होता. सन २०१७-१८ मध्ये सर्व सामान्य लोकांसाठी प्रत्यक्ष कराची प्रमाणित कपात २.५ लाख पर्यत होती, जेष्ठ नागरिकांसाठी ३ लाख रुपये प्र्यंत होती.तर अति जेष्ठ नागरिकांसाठी ५ लाख पर्यंत सुट होती. तसेच २.५ लाखाच्या पुढे आणि ५ लाखापर्यत १० टक्के प्रत्यक्ष कराचा दर होता. तर ५ लाखाच्या पुढे आणि १० लाखापर्यत २० टक्के प्रत्यक्ष कराचा दर होता. तर १० लाखाच्या पुढे ३० टक्के प्रत्यक्ष कराचा दर होता. या वरून असे लक्षात येते की या चार वर्षात आयकर स्लॅब मध्ये कोणताही बद्दल झालेला दिसत नाही.

**सारांशः**

सन २०१७-१८ चा केंद्रीय अर्थसंकल्प विशेष वाटतो. कारण हा अर्थसंकल्प प्रथमतःपुर्ण अपलोड करून मा.केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांनी त्याचे सादरीकरण केले. सन १८६९ पासून म्हणजे १५० वर्षापासून रेल्वे अर्थसंकल्प आणि सर्वसाधारण अर्थसंकल्प मांडण्यात येत होते.मात्र या अर्थसंकल्पात प्रथमच रेल्वे अर्थसंकल्प केंद्रीय अर्थसंकल्पाचा एक भाग बनला आहे.तसेच केंद्रीय अर्थसंकल्प हा फेब्रुवारी महिन्याच्या १ तारखेला सादरीकरणाचे ठरविले.

सन २०१७-१८ चा अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री अरूण जेटली यांनी या अर्थसंकल्पात टॅक्स स्लॅब म्हणजे वैयक्तिक कररचनेत कोणताही बदल केलेला नाही. नरेंद्र मोदीच्या सरकारच्या कार्यकाळातील शेवटचा पुर्ण अर्थसंकल्प असताना लोकांची निराशा केली.त्यामुळे लोकसभा निवडणुकीपूर्वी मोदी सरकारकडून वैयक्तिक कररचनेत दिलासा मिळण्याची आशा ठेवून असलेल्या नोकरदारांचा भ्रमनिरास झाला. अर्थमंत्री अरूण जेटली म्हणतात की,चालू आर्थिक वर्षात थेट करात १२.६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच करदात्यांची संख्या ६.२७ कोटीवरून ६.४७ कोटीवर पोहचली आहे. त्यामुळे लोकांनी नोटाबंदीच्या सरकारच्या निर्णयाचं इमानदारीनं स्वागत केल असून हा प्रमाणिकपणाचा उत्सव असल्याचं जेटली म्हणाले.तसेच या अर्थसंकल्पात १०० कोटीहून अधिक वार्षिक उलाढाल असणा-या फार्मर प्रोडयूसर कंपन्याना पुढील पाच वर्षासाठी आयकरात १०० टक्के सवलत देण्यात आली होती.चर्म उद्योगात रोजगार निर्मिती व्हावी म्हणून त्यांना १५० दिवसाची आयकरात सवलत देण्यात आली होती.

**संदर्भः**

१. प्रा.डॉ.संजय कप्तान आणि प्रा.जॉन्सन बोर्जेस,डायमंड वाणिज्य कोश, खंड १, २०१३, डायमंड पब्लिकेशन,पुणे
२. दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दिनांक २४ जानेवारी २०१७.
३. दैनिक लोकसत्ता दिनांक २ फेब्रुवारी २०१८.
4. https://en.wikipedia.org/wiki/Minister_of_Finance_(India)
५. https://www.indiabudget.gov.in/hindex.asp